८. साक्षीदार हजर असून शपथपत्रातील मजकूर वाचून दाखविला असता तो त्याने सांगितल्याप्रमाणे लिहिण्यात आला असल्याचे सांगून त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे तो मान्य करीत आहे व त्याखाली केलेली स्वतःची सही ओळखत आहे. सबब, शपथपत्र तपासून दाखल करून घेण्यात येत आहे.

**उलटतपास सामनेवालेतर्फे ॲड. श्री. एस.बी. मालेगावकर यांचेमार्फत**

९. युनियनने प्रस्तुत फिर्याद दाखल करण्यासाठी अधिकार दिले असे दाखविणारा ठराव मी याकामी हजर कलेला नाही. युनियनने प्रस्तुत फिर्याद ज्या कर्मचा–यांसाठी दाखल केली आहे ते कर्मचारी दवाखान्यात कार्यरत आहेत, हे म्हणणे खरे आहे. फिर्यादी युनियन ही पिंपरी चिंचवड महानगरपालिका यामध्ये रिकगनाईज्ड युनियन आहे, हे म्हणणे खरे आहे. पीसीएमसी ही कायद्यान्वये स्थापित झालेले आहे, हे म्हणणे खरे आहे. पीसीएमसीवर शासनाचे नियंत्रण आहे, हे म्हणणे खरे आहे. महाराष्ट्र सरकारला याकामी पक्षकार का केलेले नाही याचे कारण मला सांगता येत नाही.

१०. पीसीएमसी यांनी प्रस्तुत फिर्यादीत समाविष्ट असलेल्या कर्मचा–यांच्या सहा महिने कालावधीच्या नेमणूकीसाठी जाहिरात दिलेली होती, त्या जाहिरातीची प्रत याकामी दाखल केलेली आहे. महानगर पालिका आयुक्तांना कर्मचा–यांची सहा महिने कालावधीसाठी नियुक्त करण्याच्या अधिकार आहेत का, हे मला सांगता येत नाही. प्रस्तुत फिर्यादीत नमूद असलेल्या कर्मचा–यांची नेमणूक सहा महिने कालावधीसाठी झालेली होती, हे म्हणणे खरे आहे. प्रस्तुत फिर्यादीतील कर्मचा–यांच्या नेमणूका सहा महिने कालावधीसाठी असल्याने त्यांना कायम

करता येणार नाही, हे म्हणणे खरे नाही. प्रस्तुत फिर्यादीत नमूद असलेल्या कर्मचा—यांच्या नेमणूका करणेपूर्वी त्यांची तोंडी व लेखी परीक्षा घेण्यात आलेली होती. आम्ही न्यायालयात पीसीएमसीकडून कर्मचा—यांच्या तोंडी व लेखी परीक्षांच्या निकालाबाबतची कागदपत्रे मागितलेली नाहीत, हे म्हणणे खरे आहे. प्रस्तुत फिर्यादीत नमूद कर्मचा—यांच्या नेमणूका होणेपूर्वी रोस्टर पध्दत वापरली जात होती, हे म्हणणे बरोबर आहे. प्रस्तुत फिर्यादीत नमूद कर्मचा—यांच्या नेमणूका कायम पदावरही करण्यात आलेल्या नव्हत्या व ते मंजूर पदही नव्हते, हे म्हणणे खरे नाही. प्रस्तुत फिर्यादीत नमूद कर्मचा—यांच्या नेमणूका कायम व मंजूर पदांवर करण्यात आलेल्या आहेत असे दाखविणारी कागदपत्रे याकामी मी हजर केलेली आहेत. आकृतीबंध म्हणजे मंजूर पद नव्हे, हे म्हणणे खरे नाही. प्रस्तुत फिर्यादीत नमूद कर्मचा—यांना कायम करण्यात आले तर त्यांना पगार व निवृत्तीवेतन द्यावे लागेल, हे म्हणणे खरे आहे. पीसीएमसी मधील कर्मचा—यांना कायम करण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या वित्त मंत्रालयाची परवानगी घ्यावी लागते, हे म्हणणे खरे नाही. राज्य शासनाच्या आर्थिक मदतीशिवाय पीसीएमसीकडे कर्मचा—यांना पगार व सेवानिवृत्तीवेतन देण्याची ताकद नाही, हे म्हणणे खरे नाही. पीसीएमसी यांनी प्रस्तुत फिर्यादीत नमूद कर्मचा—यांना त्यांना कायम पदावर नेमलेले आहेत असे पत्र दिलेले नाही, हे म्हणणे खरे आहे. शासन निर्णय पीसीएमसी यांचेवर बंधनकारक आहेत, हे म्हणणे खरे नाही. फिर्यादीने पीसीएमसी यांना नेमणूक आदेशातील अटी व शर्ती मान्य नाहीत असे पत्र दिलेले नाहीत, हे म्हणणे खरे आहे. नेमणूक आदेशात नेमणूक तात्पुरती आहे असे नमूद आहे, हे म्हणणे खरे आहे. कोविड सारख्या अत्यावश्यक सेवेच्या वेळी अतिरिक्त कर्मचारी नेमावे लागतात, हे म्हणणे खरे आहे. शासनाच्या परवानगीशिवाय पीसीएमसी यांना कायम नेमणूका देण्याचे

अधिकार नाहीत, हे म्हणणे खरे आहे. हॉस्पीटल चालविणे हे महानगरपालिकेचे प्राथमिक काम नाही, हे म्हणणे खरे आहे. माझी सेवा १६ वर्षे झालेली आहे. पीसीएमसी चालवत असलेले दवाखाने तोटयात चाललेले आहेत का, याची मला माहिती नाही. दिनांक ०९.०२.२०१८ रोजीचा शासन निर्णय पीसीएमसीवर बंधनकारक आहे, हे म्हणणे खरे आहे. प्रस्तुत फिर्यादीत नमूद कर्मचा—यांचे व पीसीएमसी दवाखान्यातील कार्यरत कायम कक्ष मदतनीस यांच्या कामाच्या स्वरुपात फरक व तफावत आहे, हे म्हणणे खरे नाही. पीसीएमसी ही इंडस्ट्रीयल एस्टॅबलिशमेंट नाही, हे म्हणणे खरे नाही.

११. माझी नेमणूक कायम पदावर करण्यात आलेली नव्हती, हे म्हणणे खरे नाही. मी खोटी साक्ष दिली आहे, हे म्हणणे खरे नाही.

<u>उलटतपास पूर्ण</u>

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/—
(आर.जी. मलशेट्टी)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय पुणे

दि. २४.०९.२०२५

ठिकाण: पुणे